महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग
उपविभागीय अधिकारी तथा उप-विभागीय दंडाधिकारी, माणगांव विभाग माणगांव, यांचे कार्यालय
कचेरी रोड, माणगांव, ता. माणगांव, जि.रायगड
दुरध्वनी व फॅक्स क्र. ०२१४०-२६३१४१ Email ID - sdomangaon@gmail.com

| क्र.फौजदारी कात-३/देवकुंड धबधबा/कलम-१४४/२०२२ | दि. : ०४/०७/२०२२ |
|---|---|

वाचले :-

१. उपविभागीय पोलीस अधिकारी माणगांव विभाग माणगांव यांचेकडील पत्र क्र.१४२३/उविपोअ/मावि/देवकुंड धबधबा/सीआरपीसी/ १४४/२०२२, दिनांक ०४/०७/२०२२

२. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४

३. या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक- २१/०६/२०२१

## आदेश

ज्याअर्थी, उपविभागीय पोलीस अधिकारी माणगांव विभाग माणगांव यांचेकडील पत्र क्र.१४२३/उविपोअ/मावि/देवकुंड धबधबा/सीआरपीसी १४४/२०२२, दिनांक ०४/०७/२०२२ अन्वये प्राप्त अहवालानुसार माणगांव पोलीस ठाणे हद्दीतील रवाळजे दूरक्षेत्र अंतर्गत, मौजे भिरा गावचे हद्दीतील "देवकुंड धबधबा" व "सिक्रेट पॉईंट सणसवाडी" हा पावसाळी हंगामात पुणे-मुंबई व महाराष्ट्रातील पर्यटकांचे पर्यटणाचे आकर्षणाचे ठिकाण ठरते. सदरचे ठिकाण हे नैसर्गिक दुर्गम भागात असल्यामुळे तेथे कोणत्याही सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे सन २०१७ चे पावसाळी हंगामात सदर ठिकाणी भेट दिलेल्या पर्यटकांमधील ४ पर्यटक हे नदीच्या प्रवाहात वाहून गेले होते व ते मृत्यूमुखी पडले होते. तसेच सुमारे ५५ पर्यटक हे पाण्याचा जोर अचानक वाढल्याने नदीचे पात्राचे ठिकाणी अडकले होते. तसेच सन २०१८ चे पावसाळी हंगामातदेखील फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये मनाई आदेशाची मुदत संपलेनंतर ३ पर्यटक हे नदीच्या प्रवाहात वाहून गेले होते व मृत्युमुखी पडले होते. तरी सदरचा धबधबा हा पर्यटकांचे दृष्टीने सुरक्षित नसल्याने सदर परिसरात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये मनाई आदेश पारीत करणेस पोलीस निरीक्षक माणगांव यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने अहवाल सादर केला आहे.

ज्याअर्थी, उपविभागीय पोलिस अधिकारी माणगांव तसेच पोलीस निरीक्षक माणगांव यांचेकडील पत्रान्वये या उपविभागातील नैसर्गिक धबधबे, तलाव, धरणे, पावसामुळे धोक्याची परिस्थिती निर्माण झालेल्या ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत व कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून माणगांव तालुक्यातील मौजे भिरा गावचे हद्दीत "देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट सणसवाडी व आजूबाजूच्या परिसरात" पावसाळ्याच्या कालावधीत पर्यटकांची व नागरिकांची जिवित व मालमत्तेची हानी होवू नये, शासकीय व खाजगी मालमत्तेची हानी होवू नये, सार्वजनिक आरोग्य धोक्यात येवू नये, पर्यटकांची सुरक्षा अबाधित रहावी तसेच कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत राहावी म्हणून धरण/तलाव/धबधब्याचे १ कि.मी.परिसराचे ठिकाणी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(१)(४) नुसार खालील नमूद बाबींसाठी प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात यावेत अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी, प्रशाली जाधव दिघावकर, उपविभागीय दंडाधिकारी, माणगांव विभाग माणगांव, मला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४(१)(४) अन्वये प्राप्त अधिकारानुसार रायगड जिल्ह्यातील माणगांव उपविभागांतर्गत **माणगांव तालुक्यातील मौजे भिरा गावचे हद्दीत देवकुंड धबधब्यावर, सिक्रेट पॉईंट सणसवाडी व आजुबाजूच्या १ कि.मी. परिसरात** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४(१)(४) नुसार खालील नमूद बाबींसाठी दिनांक ०४/०७/२०२२ ते ३१/१०/२०२२ या कालावधीसाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करीत आहे.

१. पावसामुळे निर्माण झालेले नैसर्गिक धबधब्याचे परिसरामध्ये मद्यपान करणे किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे व उघडया जागेवर मद्य सेवन करणे.

Scanned with CamScanner

२. पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे, धबधबे, द-यांचे कठडे, धोकादायक वळणे, इ. ठिकाणी सेल्फी काढणे व कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे तसेच रहदारीवर परिणाम करणा-या ठिकाणी फोटोग्राफी करणे.
३. पावसामुळे वेगाने वाहणा-या धोकादायक पाण्यात/खोल पांण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे.
४. धबधब्याच्या वरील बाजूला जाणे अथवा धबधब्याच्या धोकादायकरीत्या पडणा-या पाण्याच्या झोताखाली बसणे.
५. धोकादायक स्थिती व जिवित हानी होईल अशा धबधबे किंवा तलाव याठिकाणी पाण्यात उतरणे.
६. रहदारीच्या ठिकाणी तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबवणे.
७. वाहन अतिवेगाने चालविणे तसेच वाहतूकीस अडथळा निर्माण होईल अशाप्रकारे वाहन चालविणे.
८. वाहनाची ने-आण करतांना बेदरकारपणे वाहन चालवून इतर वाहनांना धोकादायक स्थितीत ओव्हरटेक करणे.
९. सार्वजनिक ठिकाणी खादयपदार्थ, कचरा, काचेच्या व प्लॅस्टीकच्या बाटल्या, थर्माकोलचे व प्लॅस्टीकचे साहित्य उघडयावर इतरत्र फेकणे.
१०. सार्वजनिक ठिकाणी येणा-या महिलांची छेडछाड करणे, टिंगलटवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे, असभ्य व अश्लिल हावभाव करणे, शेरेबाजी करणे अथवा लज्जा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करणे.
११. सार्वजनिक ठिकाणी मोठया आवाजात संगीत यंत्रणा वाजवणे, डि.जे.सिस्टिम वाजवणे, गाडीमधील स्पिकर/उफर वाजवणे व त्यामुळे ध्वनीप्रदूषण करणे.
१२. ज्या कृतीमुळे ध्वनी, वायू व जल प्रदूषण होईल अशी कोणतीही कृती करणे.
१३. धरण/तलाव/धबधब्याचे १ कि.मी.परिसरात दुचाकी/चार चाकी/सहा चाकी वाहनांचे प्रवेश करणे. (अत्यावश्यक सेवा वगळून)

हा आदेश माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

सही/-
(प्रशाली जाधव-दिघावकर)
**उपविभागीय दंडाधिकारी**
**माणगांव विभाग, माणगांव**

प्रत : मा.जिल्हादंडाधिकारी सो. रायगड अलिबाग यांजकडे माहितीस्तव सविनय सादर
प्रत : मा.पोलिस अधिक्षक रायगड-अलिबाग यांजकडे माहितीसाठी सविनय सादर
प्रत : मा.जिल्हा माहिती व प्रसिद्धी अधिकारी, रायगड-अलिबाग यांच्याकडे
प्रत : उपविभागीय पोलीस अधिकारी माणगाव यांजकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी
प्रत : कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांच्याकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत : पोलीस निरीक्षक माणगाव पोलीस ठाणे, यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत : गटविकास अधिकारी, पंचायत समिती माणगांव यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(प्रशाली जाधव-दिघावकर)
**उपविभागीय दंडाधिकारी**
**माणगांव विभाग, माणगांव**

Scanned with CamScanner